**<u>प्रेस नोट</u>** **दिनांक ०७/०३/२०२६**

(१) भगवान विठ्ठल मुंढे, वय ५४ वर्षे, व्यवसाय नौकरी, पोलीस हवालदार ब.नं. ५५४, पो.स्टे सोनपेठ ता. सोनपेठ जि.परभणी रा. कोद्रीरोड, यज्ञभूमी गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी यांना ०८,०००/- रूपयांची लाच स्विकारले प्रकरणी अे.सी.बी.च्या जाळयात.

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी. |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पोस्टे सोनपेठ जि. परभणी . गुरनं .७१/२०२६, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.०७.०३.२०२६ रोजी |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | (१) भगवान विठ्ठल मुंढे, वय ५४ वर्षे, व्यवसाय नौकरी, पोलीस हवालदार ब.नं. ५५४, पो.स्टे सोनपेठ ता. सोनपेठ जि.परभणी रा. कोद्रीरोड, यज्ञभूमी गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी. वर्ग (क) |
| लाच स्विकारली रक्कम | ८,०००/- रूपये |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांनी दि.२५/०२/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, ते गोशाळा चालवण्याचा व्यवसाय करत असून त्यांची मुलगी ही गोशाळेत हजर असताना तेथे काही इसमांनी गोशाळेत येऊन दीड वर्षापूर्वी गाय व दोन वासरे सोडली होती व ती परत द्या असे म्हणून मुलीस अश्लील शिवीगाळ करून सदर गाय व वासरे घेऊन जाता येत नसताना सुध्दा घेऊन गेले. त्यावरून दि. १८/०२/२०२६ रोजी तक्रारदार यांच्या मुलीने पोस्टे. सोनपेठ येथे घडलेल्या घटनेचा तक्रारी अर्ज दिला. सदर तक्रारी अर्ज बीट जमादार भगवान मुंढे यांच्याकडे चौकशी करिता देण्यात आला होता. सदर अर्जावर काय कारवाई केली हे विचारणा करण्यासाठी तक्रारदार गेले असता बीट जमादार मुंढे यांनी सांगीतले की, त्या अर्जावर मी कार्यवाही करतो पण त्यासाठी मला तुम्ही १०,०००/- रूपये द्या असे म्हणून बिट जमादार भगवान मुंढे हे लाचमागणी करीत असलेबाबत तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारी वरून दि. २५/०२/२०२६ रोजी परळी रोड, वरील निळा फाटा येथील विश्वलक्ष्मी रसवंती गृह येथे करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान बीट जमादार पोलीस जमादार भगवान मुंढे यांनी तक्रारदार यांचे मुलीने दिलेल्या तक्रारी अर्जावरून आरोपीवर पावबंदी करण्यासाठी तक्रारदाराला १०,०००/- रू. लाचमागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी तडजोडीअंती ८०००/-रू. देतो म्हटले असता बीट जमादार भगवान मुंढे यांनी ८,०००/- रूपये स्विकारण्याचे मान्य करून लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली.

दि.०६/०३/२०२६ रोजी गंगाखेड परळी रोड वरील निळा फाटा येथील विश्वलक्ष्मी रसवंती गृह येथे करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान बीट जमादार भगवान मुंढे, पो.स्टे सोनपेठ यांनी तक्रारदार यांच्याकडून शासकीय पंचासमक्ष लाचरक्कम ८,०००/- रू. स्वत: स्विकारलेवरून गुन्हा.

| | |
|---|---|
| सापळा पथक | श्री राहुल तरकसे, पोलीस उप अधीक्षक, श्री.अल्ताफ मुलाणी पोलीस निरीक्षक, पोह/रविंद्र भुमकर,पोह/नामदेव आदमे, पोह/मदन शिंपले, मपोह/सिमा चाटे, पोना/संतोष बेंद्रे, पोशि/कल्याण नागरगोजे, शेख जिब्राईल, शाम बोधनकर, चापोशि/नरवाडे व लहाडे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. |
| सापळा अधिकारी | श्री राहुल तरकसे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी. |
| तपास अधिकारी | श्रीमती मनिषा पवार, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. परभणी |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**


| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी.** | |
| **मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड :-** 9226484699. | |
| **पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी :-** 8411808328, 9870313157, 9272211064. | |
| दुरध्वनी क्रमांक :– 02452&220597 टोल फ्री क्रमांक:– 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |


पोलीस उप अधीक्षक पोलीस उप अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो परभणी

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी